एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८.
महाटेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेतंर्गत (Maha-TUFS) तसेच इतर यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी पात्र यंत्रसामुग्री निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.१६९/टेक्स -५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २४ जुलै, २०२४.

वाचा :-

१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण २०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२.०६.२०२३.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण २०२३/प्र.क्र.८१-अ/ टेक्स-५ , दि.१२.१२.२०२३ व दि. ०६.०३.२०२४.
३. शासन निर्णय क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.१६९/टेक्स-५,दि.१०.११.२०२३
४. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र दि.१६.०४.२०२४.
५. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र दि.१८.०७.२०२४.

प्रस्तावना :-

वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी संदर्भ क्र.१ अन्वये एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहिर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयात नमूद महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेतंर्गतच्या (Maha-TUFS) यंत्रसामुग्री तसेच इतर यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी पात्र यंत्रसामुग्री निश्चित करण्यासाठी संदर्भ क्र.३ अन्वये आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. संदर्भ क्र.४ अन्वये A-TUFS व RR-TUFS अंतर्गत केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या यंत्रसामुग्रींच्या यादीमधील यंत्रसामुग्रींचा अभ्यास करुन सदर यंत्रसामुग्री महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेतंर्गत (Maha-TUFS) तसेच इतर यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी पात्र यंत्रसामुग्री अधिसूचित करण्यासाठी शासनास शिफारस केली आहे. तसेच केंद्र शासनाने A-TUFS व RR-TUFS अंतर्गत अधिसूचित केलेल्या यंत्रसामुग्रींच्या यादीमध्ये समावेश नसलेली परंतु यापूर्वी स्थापित असलेल्या (existing machinery) इतर यंत्रसामुग्रींचा अभ्यास करुन सदर यंत्रसामुग्री महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड

योजनेतंर्गत (Maha-TUFS) तसेच इतर यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी पात्र यंत्रसामुग्री अधिसूचित करण्यासाठी शासनास शिफारस केली आहे.

A-TUFS व RR-TUFS अंतर्गत केंद्र शासनाने अधिसूचित केलेली यंत्रसामुग्रीची यादी केंद्र शासनाने त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे ही यंत्रसामुग्री महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेतंर्गत (Maha-TUFS) तसेच यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी पात्र ठरते. तसेच सदर यादीमध्ये समावेशित नसलेली परंतु यापूर्वी स्थापित असलेल्या (existing machinery) इतर यंत्रसामुग्रींचा अभ्यास करुन सदर यंत्रसामुग्री महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेतंर्गत (Maha-TUFS) तसेच इतर यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी पात्र यंत्रसामुग्री अधिसूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

केंद्र शासनाने A-TUFS व RR-TUFS अंतर्गत अधिसूचित केलेल्या यंत्रसामुग्रींच्या यादीमध्ये समावेशित नसलेली परंतु यापूर्वी स्थापित असलेल्या “परिशिष्ट अ” मधील यंत्रसामुग्री महा टेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेतंर्गत (Maha-TUFS) तसेच इतर यंत्रसामुग्रींना भांडवली अनुदानाचा लाभ देण्यासाठी अधिसूचित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या धोरणाच्या कालावधीत केंद्र शासन पुरस्कृत A-TUFS/RR-TUFS योजनेच्या निकषाप्रमाणे असलेल्या यंत्रसामुग्री तसेच या शासन निर्णयान्वये अधिसूचीत करण्यात येत असलेली “परिशिष्ट अ” मधील यंत्रसामुग्री भांडवली अनुदानासाठी पात्र असतील. पात्र यंत्रसामुग्रीमध्ये फक्त नवीन यंत्रसामुग्रीचा समावेश करण्यात येईल, यामध्ये जुनी किंवा नुतनीकरण केलेली यंत्रसामुग्री ग्राह्य धरली जाणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७२४१२०१२०१२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

SHRIKRISHNA BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2024.07.24 12:16:14 +05'30'

(श्रीकृष्ण पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह, विधी व न्याय) महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई.
७. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई.
८. मा.खासदार (सर्व) महाराष्ट्र राज्य.
९. मा.आमदार (सर्व) महाराष्ट्र राज्य.
१०.मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र- १, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर
१४. महालेखापाल, (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
१५. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
१६. संचालक (रेशीम),रेशीम संचालनालय, नागपूर.
१७. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
१८. व्यवस्थापक, टफ सेल मधील सर्व बँका.
१९. सर्व समिती सदस्य.
२०. वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने.
२१. निवडनस्ती (कार्यासन टेक्स-५).

शासन निर्णय क्र. धोरण-२०२३/प्र.क्र.१६९/टेक्स -५ दि. २४ जुलै, २०२४ सोबतचे परिशिष्ट "अ"

I) LIST OF SPINNING MACHINERY

Sr No.	Name of the Machinery	Segment
1	Roving end Opener machine mechanical/pneumatic type	Spinning
2	Auto Piecer for Ring frame/Electric Bike for Ring Frame Tenter.	Spinning
3	Compact Yarn Mechanical/Pneumatic Type, Siro Yarn Attachment.	Spinning
4	Line for Manufacturing of Viscose Fibre / Filament Yarn	Spinning

II) LIST OF WEAVING MACHINERY

Sr No.	Name of the Machinery	Segment
1	Sample shuttle less Loom	Weaving Preparatory
2	Cone to Cone Sizing Machine for Spun or Filament Yarn	
3	Surgical Gauze Multiple Yarn Sizing Machine	
4	Sample Warping Machine	
5	Quick Style Change Equipment	Weaving

III) LIST OF MACHINERY FOR WOOL SCOURING, COMBING AND CARPET INDUSTRY (WORSTED/SEMI-WORSTED SYSTEM OF SPINNING)

Sr No.	Name of the Machinery	Segment
1	Tow to Top Convertor for Polyester Cutting	Worsted Spinning
2	Stretch Breaker Machine for Acryclic	Worsted Spinning
3	Fringing Machine for Carpet Edge for Woven and Tufted Carpet.	Worsted Spinning

IV) LIST OF MACHINERY FOR NON-WOVENS / TECHNICAL TEXTILE

Sr No.	Name of the Machinery	Segment
1	AIRLAID Technology (for Hygiene Products)	Non-Woven
2	WETLACE Technology (for Hygiene Products)	Non-Woven

3	AIR THROUGH BONDING (for Hygiene Products)	Non-Woven
4	Solution Spinning Line	Technical Textile
i	Wet Spinning	
ii	Dry Jet Spinning	
iii	Dry Jet Spinning	
iv	Gel Spinning	
5	Monofilament Extrusion Lines	Technical Textile
6	Multifilamen Extrusion Lines	Technical Textile
7	Bi/Tri-Component Melt Spinning	Technical Textile
8	Tape Yarn extrusion Line	Technical Textile
9	Blown Film Machine + Slitter + Warp Knitting If installed with film Slitter for tape yarn and warp knitting for Agro textile nets	Technical Textile
10	Extrusion Coating Machine for Yarn and Fabric	Technical Textile
11	Ring Twister for Heavy Denier Technical Yarns	Technical Textile
12	Single Step Plying Twisting and Winding Machine	Technical Textile
13	PLC controlled 4 axis Filament Winding Machine for Composites Specification : Mandrel Rotation of 150 rpm or more.	Technical Textile

V) LIST OF MACHINERY FOR PROCESSING OF FIBRE/ YARN/ FABRICS

Sr No.	**Name of the Machinery**	**Segment**
1	Sanforizer / zero-zero with Shrinkage Imparting Rubber and Felt Unit and Weft Straightener System	Processing